# संसाराणूपेंडघार

**-- चं.प्र.देशपांडे.**

( एका बाजूने बाळू येतो, एका बाजूने शकू येते. दोघांच्याही हातात वह्यापुस्तके. घाईत थोडे धडकतात. शकूच्या हातातली वह्यापुस्तके खाली पडतात. ती उचलू लागते. बाळूही 'सॉरी' म्हणून तिला मदत करू लागतो.)

बाळूः एका हिंदी पिक्चरमध्ये असाच सीन आहे. यातून मग पुढे हिरो -- हिरॉईनच प्रेमबीम जमतं. असं पुढं बरंच आहे मग.

शकूः ( बावचळलेली. अस्वस्थपणे --) दिल्लीला जायचं जायचं म्हणायचं आणि मग महागाई झाली की नोकरी शोधत बसायचं.

बाळूः अगदी बरोबर. माझं नाव बाळू. तुमचं ?

शकूः शकू -- म्हणजे शकुंतला आराध्ये.

बाळूः मी बाळ मराठे. माणसाच्या भूतकाळाचं मला फार कुतूहल असल्यानं भविष्याबद्दल मी नेहमीच साशंक असतो. जन्म आणि मरण हा फरक कशासाठी ठेवलाय तेच कळत नाही.

शकूः ( लाजून --) फार मदत झाली मला तुमची.

बाळूः तुम्हाला मदत करायला मलाच तुमची मदत झाली. तुम्ही नसता तर माझा धक्का कुणाला लागला असता ?

शकूः तरीसुध्दा डब्यापेक्षा फ्रीजमध्ये जिन्नस जास्त चांगले राहतात की नाही ?

बाळूः ( स्मित करीत -- ) तुम्ही सुंदर आहात म्हणून काही अंतराळ - संशोधन थांबवायची गरज नाही.

शकूः ( आणखी लाजून खाली पाहात -- ) सडलेली भाजी हॉटेलात विकताय झालं !

बाळूः ( जरा जवळ येऊन, उमदेपणाने -- ) उंदीर हे सापाचं भक्ष्यच असतं -- आणि हा नियम काही सापानं तयार केलेला नसतो.

शकूः चला !

बाळूः तिकिटांचे दर वाढले म्हणून काही अंग मोहरून आलेलं थोडंच लपून राहतंय !

शकूः मी निघून जाईन हं अशानं ! आमच्या वकिलांनी मला अनेकदा बजावलंय की उजवा पाय खाजत असला तर डावा खाजवावा म्हणून !

बाळूः तरीच ! मी विचारच करत होतो की, संध्याकाळच्या वेळी गायींच्या गळ्यांतल्या घंटांचा आवाज येत नसतानासुध्दा मला दारू का प्यावी वाटतीय !

शकूः ( चोरट्या चावटपणाने -- ) खरंच तुमच्या मनात असं येतं ! मग ओळख टिकेलच आपली ! मलासुध्दा गाजराची जेली करता येते ! बरं, बराच उशीर झालाय, जाऊ मी ?

बाळूः थांब ना जरा ! पददलित असणं ही काय फक्त दलितांचीच मक्तेदारी असते का ?

शकूः अरे पण तेवढ्यात डॅडींना हार्टअॅटॅक आला म्हणजे ?

बाळूः ओळखणारे मला चांगले ओळखतात. निदान त्यांचा तरी गैरसमज होणार नाही हे मी नक्की सांगू शकतो.

शकूः ( लटक्या रागाने - ) मग मी लोणच्याचा विषय कधीच काढणार नाही हं ! फक्त राजकारणाशिवाय काही बोलणारच नाही मी !

बाळूः असं नको बुवा करूस. तू रागावलीस की माझ्या तळपायात धडधडायला लागतं.

शकूः काहीतरीच ! ए, जाते ना मी. उगीच काय !.

बाळूः बरं जा. पण एका अटीवर --

शकूः हं, सांग लौकर --

बाळूः उद्या आपण भेटू तेव्हा अशी जायची घाई करायची नाही --

शकूः सावित्रीचा बापच दिसतोस तू !

बाळूः कसं काय ?

शकूः यात उद्या भेटायचं हे नक्की झालं ! ( हसते. जाते. बाळूही वळून जाऊ लागतो, तेवढ्यात करड्या

आविर्भावाचा सुनिल येतो.)

सुनिलः बाळू -- ( बाळू थांबतो. ) तुला काही सांगायला आलोय.

बाळूः बोल --

सुनिलः तू शकूचा नाद सोड. महागात पडेल !

बाळूः ( दोन क्षण पाहून,शांतपणे -- ) गाडीला गर्दी आहे म्हणून गाडी सोडून देण्याऱ्यातला मी नाही सुनिल ! मी लटकत जातो पण गाडी सोडत नाही !

सुनिलः माझं न ऐकण्याचे काय परिणाम होतात ते तुला माहीत नाही असं दिसतंय !

बाळूः ( धिमेपणाने दोन पावले टाकून त्याच्या जवळ येऊन डोळ्यांत पाहात -- ) कावळ्यालासुध्दा दोनच पंख असतात. माणूस पंतप्रधान होतो तेव्हा त्याचा गाडीतल्या गर्दीचा अनुभव जुना झालेला असतो.

सुनिलः ( दोन पावले मागे जाऊन खिशातून सुरा काढतो. बाळू पाहतो आणि त्याला पाठमोरा होऊन हसतो --) हसू नकोस बाळू, जड जाईल तुला, जड जाईल --

बाळूः ( तसाच पाठमोरा --) मला भीती वाटते तेव्हा मी हसतो अशी तू कल्पना करत बस ! ( झटकन जातो.)

सुनिलः ( ओरडत ) बाळू -- महागात पडेल हे तुला बाळू -- महागात पडेल -- तलाठ्याच्या ताठ लाठीचा एकच दणका बास होईल याला -- ऑरेंजसुध्दा मागायचा नाही -- ( जातो. )

( बाळू वाट पहातो आहे. जरा वेळाने शकू येते. )

बाळूः फार वाट पाहायला लावलीस --

शकूः सुनिल भेटला होता -- बरंच बडबडत होता--

बाळूः काय ?

शकूः म्हणे घरच्यांशी तुझं फार भांडण आहे -- तुला जुगार खेळायचा नाद आहे -- सुलू सुलाखेनं तुला चप्पल मारली होती आणि तुझ्या गुप्त भागाच्या जवळ कोड आहे --

बाळूः ठीक आहे -- आज दुकान बंद होतं म्हणून राहिलं --उद्या मी पँटला रफू करून आणीन -- पण मग तू काय म्हणालीस ?

शकूः ते माझं मी पाहून घेईन म्हटलं --

बाळूः आता बाकीच्या गोष्टी मी पुराव्यानं सिध्द करून देऊ शकतो पण उरलेल्या बाबतीत त्याच्यावर विश्वास ठेवायचा की माझ्यावर हा तुझा प्रश्न आहे.

शकूः म्हणजे माझ्यावर तुझा विश्वास नाही -- मी तुझ्यावर अविश्वास दाखवीन असं वाटतं तरी कसं तुला --

बाळू : ठीक आहे -- कोडाचं कोडं सध्या सोडवायचंच नाही हे तू ठरवलंस हे उत्तम झालं -- अर्थात आज योग्य नसलं तरी उद्या खात्री पटेलच तुझी !

शकूः नंतर खूप घाईनं आले मी -- बसचं तिकीटसुध्दा काढायचं विसरले. तरी उशीर झालाच.

बाळूः म्हणूनच अव्दातव्दा बोलण्यापेक्षा एखादी चूक केलेली परवडते.

शकूः अरे तसंच झालं ! आमची मावशी आहे पस्तीशीची. तिच्या दुसऱ्या मुलात आणि आत्ता झालेल्या मुलीत बारा वर्षांचं अंतर आहे. फार चेष्टा करतात तिची.

बाळूः मला भेटायचंय एकदा तुमच्या माळ्याला. रोपं कुठून आणली ते विचारायचंय.

शकूः एवढंच ना ! मग त्यात एवढे आढेवेढे कशाला ? सरळ डॅडींच्याकडे येऊन विषय काढायचा.

बाळूः ते झालं. पण नोकरी आणि इतर व्याप सांभाळून काय काय करणार माणूस ! कधीकधी तर इतका कंटाळा येतो की निघावं आणि ताबडतोब येऊन तुला भेटावं असं वाटतं !

शकूः ( सद्गदीतपणे--त्याचा हात हातात घेऊन -- ) माझेही कधीकधी फार हाल होतात -- मी अभ्यासासाठी पुस्तक उघडते तर संपूर्ण इटालियन जॉब सुरू होतो डोक्यात --

बाळूः काही काळजी करू नकोस तू -- अं -- मी आहे ना --

शकूः कशाकशातून आपल्याला जावं लागणार आहे काही कळत नाही -- अशीच अखंड साथ राहील ना मला तुझी ?

बाळूः कुठंही सोडा मिळत नसला म्हणून काय झालं ? प्यायच्या पाण्यात खायचा सोडा टाकून लिंबू तर पिळता येईल !

शकूः ( डोळे टिपून -- सावरून -) तुझ्याशिवाय या जगाची कल्पनाच करता येणार नाही मला --

बाळूः माझा भोवरा मी तुझ्यासाठीच राखून ठेवलाय --

शकूः माझ्या दोरीनं फिरव तो हवा तेवढा --

बाळूः हं --

शकूः काढशील ना विषय डॅडींकडे ?

बाळूः माळ्याची परवानगी मिळेल ना पण मावशीला भेटायला -- आपलं डॅडींची माळ्याला भेटायला ?

शकूः ( हसून ) किती गडबड उडालीय तुझी ! वेडा आहेस अगदी !

बाळूः लोकांना आपण लौकरच पेढे वाटू...( प्रकाश मंद होत जातो...अंधार... पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा शकू विणत बसलेली...)

बाळूः शकू, शकू, हे चांगलं नाहीय लक्षण. तू ऐकत नाहीयस माझं. अगदी माझ्याकडेही लक्ष राहीनासं झालंय तुझं !

शकूः अरे इतका काय उतावीळ होतोस अगदी -- एवढी सुई झाली की टाकतेच चहा --

बाळूः ते काही नाही--आज डॉक्टरांच्याकडे जाऊन यायचंच आपण -- अंगावर काढणं धोक्याचं वाटतं मला --

शकूः आता लग्नच केलंय तुझ्याशी -- ऐकायला पाहिजेच तुझं-- तरी डॅडी मला नेहमी म्हणायचे की फार उंच टाचेच्या चपला घालून घसरून पडशील कधीतरी -- मम्मी नुसती हसायची त्यावेळी --

बाळू : तू नुसतं मला चिडायलाच लावायचं ठरवलं आहेस का ? एकही गोष्ट वादावादीशिवाय होऊच द्यायची नाही का ? विणलेलं तुझंच सगळं फुकट गेलं म्हणजे ?।

शकूः यात काय वाद घातला बाई मी ! डॅडींची आणि मम्मीची आठवणही आवडत नाहीशी झालीय तुला --

बाळूः शकू, माझ्या रागाचा अंत पाहू नकोस तू, सांगून ठेवतोय -- तो -- तो तुझा किंवा माझासुध्दा अंत ठरू शकेल --

शकूः अरे पण डॉक्टरांच्याकडे जायला नाही म्हणतेय का मी ? जाऊ या तर जाऊ या !

बाळूः हेच, हेच चुकतं तुझं ! इतकं सगळं झाल्यावर मग कबूल करायचं ! तोपर्यंत माणसाच्या डोक्यात कोंडा होतो अगदी !

शकूः तुझ्या डोक्यात कोंडा लग्नाच्या आधीपासूनच व्हायचा, तेव्हा तर मी नव्हते ?

बाळूः तरी बरं, ती कोडाची शंका फिटलीय तुझी !

शकूः ईऽऽ त्या माणसाची आठवण जात कशी नाही तुझी ? आणि मला शंका नव्हतीच मुळी--

बाळूः याचा अर्थ तू जागची हलणार नाहीस -- परस्पर होईल तेवढं बरं अशी वृत्ती झालीय तुझी -- ठीक आहे -- मी बाहेरच जातो -- ( जातो. )

शकूः ( चिडून ) जायचं तं जा ! सारखंच चिडचिड केली तर कोण किंमत देतंय ! मुंबईत गर्दी फार म्हणून दिल्लीला जायचं, दिल्लीत पुढारी फार म्हणून चेन्नईला जायचं, तर तिथं भाषा समजत नाही ! आणि खेड्यात कंटाळा येतो ! करायचं तरी काय माणसानं ! आणि किती करायचं ! प्रेमाचा परिणाम हा शेवटी असा होतो हे कळलं असतं तर कशाला प्रेम केलं असतं !

बाळूः ( येऊन, पुढे येत --) झालं की नाही तुझं ? मारवाड्याच्या हॉटेलात सिगरेट फुंकून चहा पिऊन आलो मी -- तरी तुझं अजून तेच चाललंय !

शकूः बरं चल बाबा, लगेच चल ! डॉक्टरांकडे जाऊन आल्याशिवाय चैन पडणार नाही तुला. ( केस, साडी नीटनेटकी करते. निघतात. आता डॉक्टर. दोघेही येतात.)

बाळूः नमस्कार डॉक्टर.

डॉक्टरः नमस्कार, नमस्कार ! काही तक्रार नाही ना -- आपलं काम परफेक्ट असतं -- कुठल्याही गिऱ्हाईकाची तक्रार येऊ देत नाही आपण -- माणूस बघून मापं सांगतो आपण -- मापं आपल्या डोळ्यांत असतात -- हातानंच घ्यायला पाहिजेत असं काही नाही --

शकूः नाही, माझी काही तक्रार नाही, याची आहे.

बाळूः डॉक्टर, मला पँट फार टाईट होतीय -- आता माझी तब्येत सुधारलीय का पँटची बिघडलीय ते तुम्ही बघा -- दुसरं म्हणजे मी तुम्हाला मागं एक खिसा शिवायला सांगितला होता, तो तुम्ही शिवला नाहीत. त्यामुळं पुढंच सगळं ओझं होतंय आणि त्याचा मला त्रास होतोय. असह्य होतयं अगदी. बघा एकदा काय ते !

डॉक्टरः बघू, मला बघू द्या जरा. ( त्याचं मुंडकं इकडे तिकडे वळवून कान पाहतात. डोळे फाकून पाहतात -- तो प्रत्येक वेळी ' ओय ' ' ओय ' करतो. त्याच्या भोवती फिरून -- ) तुम्हाला काहीही झालेलं नाही. फक्त

एकच आहे, आंबे जरा जपून खा तुम्ही. आंबे खाताना जर खाली सांडलं आणि कपड्यांवर डाग पडले तर तुमचे कधीच निघणार नाहीत.( शकूच्या दिशेला हात करून ) यांचं काही नाही. यांना कितीही, कसेही खाऊ देत आंबे ! यांचं मुळात सांडायचं नाही -- आणि सांडलं तरी डाग दिसायचे नाहीत -- अगदी कळूनसुध्दा यायचं नाही -- तुम्हाला मात्र जरा जपून राहायला पाहिजे -- यांचा प्रश्न नाही !

बाळूः मग मागं खिशाची काही गरज नाही म्हणता ? मला वाटत होतं --

डॉक्टरः अजिबात गरज नाही -- आंबे फक्त योग्य वेळी, योग्य ठिकाणी आणि शक्य तो कपडे काढूनच खा म्हणजे झालं -- मग डागांचा प्रश्नच येत नाही --

शकूः बरं, डॉक्टर मला एक विचारायचं होतं -- ( बाळूला ) विचारू का ?

डॉक्टरः विचारा, विचारा. त्यांना काय विचारताय, मला विचारा.

शकूः नाही ते नव्हते विचारत मी , फक्त विचारू का नको ते विचारत होते.

डॉक्टरः विचारा, विचारा. एकमेकांच्या विचारानं होऊं द्या काय ते. अहो, संसारात नवरा आणि बायको म्हणजे रथाची दोन चाकं आहेत. गायीला पेंड घालायची म्हटलं की गाय पाहिजे, पेंड पाहिजे, आणि ( शकूला --) आणि काय ?

शकूः घालणाराही पाहिजे.

डॉक्टरः बरोब्बर, बरोब्बर ! विचारा आता. परवानगी मिळाली ना ! विचारा.

बाळूः विचार, विचार.

शकूः डॉक्टर, हल्ली बाळूचा मला सारखा राग येतो. कसंसंच वाटत राहातं. पूर्वी प्रेम होतं ते बरं वाटायचं. तसं आता आमचं पुन्हा कधीच होणार नाही का ? काही मनाचा रोगबीग तर नसेल ना ?

डॉक्टरः हां ! त्याचं असं आहे की, याला काही तरी कारणं असणार. एखाद्या कारणामुळं जेव्हा मनात काही घडतं, तेव्हा तेव्हा तो रोगच असतो. तसं तर मग ते पूर्वीचं तुमचं प्रेमबीम म्हणताय तोही रोगच होता असं म्हणावं लागेल. परराष्ट्र धोरण वेगळं, अंतर्गत धोरण वेगळं, प्रसिध्दी खातं वेगळं -- असलं मनाच्या बाबतीत व्हायला लागलं की हाल होणारच.

शकूः मग उपाय काय यावर ?

डॉक्टरः उपायच म्हणाल तर मला सांगता येणार नाही. पण कारणं दुरुस्त करायचा प्रयत्न करत बसून काही उपयोग होत नाही एवढं खरं. मी उदाहरणार्थ कपडे शिवून देत असलो तरी कपड्यांतलं सगळं मला कळतं असं मुळीच नाही. तरीही तुम्ही एक करा. असा काही प्रश्न तुमच्या मनात तयार झालाय असं समजूच नका तुम्ही. प्रश्नबिश्न काही नाही असंच वागा.

बाळूः मी तेच सांगत असतो तिला. तर तिचं आपलं एकच -- एकदा गाडी चुकली की चुकली -- मग दुसऱ्याच गाडीनं जावं लागतं.

डॉक्टरः हे बघा, तुम्हीसुध्दा उदाहरणं ताणत जाऊ नका -- आणि मला असं वाटतं की, तुम्ही ते आंब्याचं तेवढं सांभाळलंत तर तुमचे बरेचसे प्रश्न कमी होतील.

शकूः बघितलंस, इतका साधा उपाय होता, पण आपल्या काही लक्षात आलं नाही.

बाळूः म्हणूनच मी म्हणत होतो की, एकदा डॉक्टरांची भेट घेऊ या. फी किती डॉक्टर ?

डॉक्टरः कोण देणार ?

बाळूः मी --

डॉक्टरः एक पँट, एक शर्ट, एक गंजीफ्रॉक आणि ...नाही बस्स, एवढंच !

बाळूः आभारी आहे डॉक्टर--थोडं कन्सेशन दिल्याबद्दल ! घरून पाठवून देतो--वर एक हातरुमाल पाठवतो --

डॉक्टरः ठीक आहे.

बाळूः बरंय, नमस्कार.

शकूः नमस्कार डॉक्टर.

डॉक्टरः नमस्कार, नमस्कार, या ! ! ( दोघे बाहेर पडतात. आता डॉक्टर नाही. )

बाळूः बघ, बरं झालं की नाही डॉक्टरांची भेट घेतली ते -- नुसतं लोकरीचा गुंता सोडवला की तुला असं वाटतं की आपण जगाचाच गुंता सोडवतोय --

शकूः आता याच्यावर आणखी वाद नको -- कंटाळा आला अगदी वादावादीचा --

बाळूः म्हणजे मुळात वादावादी होते तुझ्यामुळं आणि वर मीच ऐकून घ्यायचं हे तुझं !

शकूः ( रडत ) फक्त दुपारी दूध तापवायचं राहिलं तर संध्याकाळी नासून गेलं ते ! मी तरी काय करू ...( डोळे पुसते. )

बाळूः ( सुजाणपणे --) रडू नकोस, चल. आज आपण हॉटेलात पुरीभाजी खात खात अमेरिकेचा प्रेसिडेंट कोण होणार याच्यावर चर्चा करू या -- अं ! का शेतकऱ्यांना भाव बांधून देण्याबद्दल बोलायचं ? तुला आवडेल ते बोलू. माझं तरी काय, तू सुखात असलीस की मला बरं वाटतं.

शकूः यापुढं आता चुकणाऱ्या गाडीनं जायचंच नाही कधी -- ठरवतानाच नंतरची गाडी ठरवायची --

बाळूः नाही. ठरवायची नेहमीचीच गाडी, पण मनात असं ठेवायचं की, खरं म्हणजे आपल्याला नंतरच्या गाडीनं जायचंय --

शकूः बरं बाबा, तसं म्हण ! मीच माघार घेते !

बाळूः अगं,अगदी माघारीचं स्वरूप कशाला द्यायला पाहिजे याला? मिळेल त्या गाडीनं जाऊ, आहे काय त्यात !

शकूः माझ्यामुळं खूप बदललास तू ! काहीही, कसंही चालतं तुला हल्ली ! वाईट वाटंत मला. पूर्वी तू असा नव्हतास. मी तरी काय मुद्दाम असं वागते का ?

बाळूः अणूबॉंबचा स्फोट हळू हळू होत चालल्यासारखं होऊन गेलंय आयुष्य ! आपण सुधारणा करू हळूहळू यात ! तुझ्या परकराच्या नाडीची गाठ इतकी आवळून बांधत जाऊ नकोस.

शकूः पहिल्यापहिल्यांदा असंच असायचं माझ्या मनात पण पूर न येताच कसं सगळं वाहून गेलं तेच कळलं नाही--

बाळूः बरं, जाऊ दे ते -- आता यापुढे डॉक्टरी सल्ल्यानं वागू म्हणजे झालं -- इतकं काही गंभीर प्रकरण झालेलं नाही आपलं --

शकूः ( त्याचे हात हातात घेऊन समजुतदारपणे --) ताव मारून मारून वात वाढत चाललाय तुझा -- यापुढे सगळं बदलू आपण.

बाळूः ( तिच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवून प्रेमानं तिच्या डोळ्यांत पाहात -- ) वेतानं बडवलं तरच तू तेवत राहशील. होय ना ?

शकूः चल चावट ! ( अंधार, संगीत. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा बाळू वर्तमानपत्र वाचत बसलेला. शकू चहाच्या कपबशा घेऊन येते. एक त्याला देते. दोघेही चहा पितात -- पितापिता बोलतात -- )

बाळूः हल्ली मला फार अशुभ सूचक स्वप्नं पडतात. एकतर माझं तरी काहीतरी वाईट होणार नाहीतर माझ्या हातून तरी काहीतरी वाईट होणार.

शकूः हे काय बाई नवीन आणखी ! सत्रांदा सांगत असते मी लक्ष्मीबाईंना की कपडे धुताना दगडावर फार आपटण्यापेक्षा ब्रश वापरत चला --

बाळूः मी सिलोनमध्ये आहे असं वाटलं एकदम स्वप्नात... आणि मी सिलोनला गेल्यापासून भारतात गुन्हेगारीचं प्रमाण घटल्याची बातमी आलेली वाचली मी वर्तमानपत्रात -- मीच सगळ्या गोष्टींना जबाबदार असल्यासारखं वाटत होतं मला स्वप्नात.

शकूः जाऊ दे ते ! काल ऑफिसात जाताना पेन विसरून गेलास, त्याचा फार मनस्ताप झाला असणार तुला...मलासुध्दा असंच होतं... त्या त्या वेळी प्रत्येक गोष्ट संपून गेली पाहिजे... तसं होतच नाही कधी ...( दारावर टकटक होते...)

बाळूः कोण आहे ?

सदूः ( बाहेरून -- ) मी सदू न्हावी.

बाळूः उघड गं दार जरा --

शकूः इश्श ! कुणीही आलं तरी मलाच काय उघडायला सांगतोस --

बाळूः तुझ्या मैत्रिणी येतात तेव्हा मी नाही उघडत ? ( ती जाऊन दार उघडते. सदू न्हावी आत येतो.)

सदूः ( बाळूला --) सदू न्हाव्याची टकटक ओळखू येईनाशी झाली होय रे ?

बाळूः तसं नाही रे !

सदूः बरं, संसारात काय कमीजास्त ? काहीही पाहिजे असलं तर निःसंकोचपणे सांगा. आपण भरपाई करून देऊ.

बाळूः कमी काही नाही -- फक्त दुःख जास्त झालंय -- ते कमी करून हवंय --

सदूः गेली पंचवीस वर्षं मी धर्मोपदेशक म्हणून काम करतोय पण मानवजात काही बदलत नाही. धर्म म्हणजे धर्मभेद नाही हां. धर्मभेद नसलेला धर्म.

बाळूः पण मी सिलोनला जाण्याचा आणि इथली गुन्हेगारी कमी होण्याचा संबंध काय ?

सदूः पॅट्रिक लुमुम्बा हे नाव माहिती आहे का तुम्हाला ?

शकूः मी ऐकलंय हे नाव पण ते कोण होते, काय करत होते ते काही आठवत नाही आता. पण नाव आठवतंय.

सदूः तसंच आहे ते.

बाळूः म्हणजे दुःखावर काही उपाय नाहीच तर ?

सदूः मला काल एक धार्मिक आदेश आला.

बाळूः मलासुध्दा उपरती व्हायला लागलीय.

सदूः म्हणजे असं की मी तुमच्याकडे यायचं -- कुणी ? मी -- म्हणजे या सदू न्हाव्यानं -- बरं का -- आणि पुढं असं की एक तर या बाळासाहेबांचा -- म्हणजे यांचा -- माझ्या हातून मृत्यू होणार, नाहीतर माझा त्यांच्या हातून -- असं ! तर आता यातलं काय कसं व्हावं ते आपणच विचारविनिमय करून ठरवायचं -- फक्त याच्यात आपापल्या जगत राह्यच्या इच्छेचा प्रश्न न आणता निर्णय झाला पाहिजे.

बाळूः नुसतं कायम पुढचं प्रमोशन कधी याची वाट पाहात जरी म्हटलं तरी आयुष्य सहज संपू शकतं.

शकूः ते खरं असलं तरी फार मोठ्या अपेक्षा धरूच नयेत माणसानं. आफ्रिकेतल्या जंगलात कोण धरत असेल असल्या अपेक्षा ? कॅबरेत नाचून थंडी वाजण्यापेक्षा ते बरं.

बाळूः वाद घालायचं काही तू सोडू नको. इथं जीवनमरणाचा प्रश्न आलाय आता.

सदूः परमेश्वर हा मला सर्वप्रिय आहे असं म्हणण्यापेक्षा मी असं म्हणेन की परमेश्वर हा सदू न्हावी आहे.

शकूः मग यात काय विशेष आहे ? भाजी करायची म्हटल्यावर फोडणी लागणारच.

सदूः ही कल्पना होतीच मला. शेवटी हाच मुद्दा महत्त्वाचा ठरणार हेही मला आधीच माहीत होतं. माझ्या पोतडीतून मी सुरा आणलेला आहे. ( पोतडीतून सुरा काढून बाळूच्या हातात देतो.)

बाळूः ( हंसून ) म्हणजे अशुभ आणि शुभ यातला फरक मला अजून नीटसा समजत नाही एवढाच याचा अर्थ.

सदूः आता सारवासारवी करायचं काहीही कारण नाही.

शकूः पण यानं समजा नोकरी सोडली तर त्याचे परिणाम काय होतील त्याचा विचार करायला नको ? नंतर पस्तावून काय उपयोग ?

सदूः तुमचा कृतीवर विश्वास नसेल तर मग मी आपला जातो. मला भटजीकडून दाढी करून घ्यायची आहे. कारण पहिली संधी मी बाळासाहेबांना दिलेली आहे. आता मी इथून जाणं ही मात्र माझी कृती ठरणार आहे हे लक्षात ठेवा. धार्मिक आदेश कधीच खोटे नसतात. धर्म म्हणजे धर्मभेद नव्हे हां !

बाळूः ( सुरा परत देऊन --) आभारी आहे.

सदूः बरंय जातो. खरी क्रांती शेवटी रक्तपाताशिवायच होत असते. बरंय बाळू !

शकूः बरंय ! ( सदू जातो. )

बाळूः ( काही क्षणांनी उठून उभा राहतो. सावकाशपणे एकदोन येरझाऱ्या घालतो. चेहरा गंभीर. मग --) तो गेल्यापासून खरंच मला आत्महत्या करावी असं वाटायला लागलंय.

शकूः घार हिंडते आकाशी तिचे लक्ष पिलापाशी.( हुंदका फुटत --) म्हणजे माझ्या होणाऱ्या मुलांना त्यांच्या वडिलांचं नाव दुसरंच सांगावं लागणार मला.

बाळूः रडू नकोस. वेळ थोडा असला तरी गाडी एखादवेळेस लेटही येऊ शकते.

शकूः नुसतं दुकानदारानं माझ्या हाताला हात लावला तर तू किती चिडला होतास ते आठव. ते आठव ना ! गाडीचं सांगतोय !....

बाळूः आता कुठे काय प्रश्न येतोय ? करारनामा झाला, सह्या झाल्या आणि मुख्य म्हणजे करार पाळायची दोघांचीही इच्छा आहे.

शकूः नुसतं गल्लीबोळातलं तत्त्वज्ञान सांगत राहणार तू... तुझ्या बाहेर मी एक आहे त्याचं काहीच नाही.

बाळूः तुझ्या सहकार्याची अपेक्षा ठेवण्यात काही अर्थ नाही हे लक्षात आलेलं आहे माझ्या. तुझ्या होणाऱ्या मुलांच्या आईचं वेगळं नाव खरोखर सांगता येईल अशी कुठं सोय आहे ?

शकूः म्हणजे सैपाक मीच करायचा, धुणीभांडी मीच करायची, बाकीचं सगळं मीच करायचं आणि सकाळी उठल्यावर चहा मीच करायचा...

बाळूः रडू नकोस शकू -- काहीही झालं तरी आपण प्रेमविवाह केलेला आहे.

शकूः मग नाईलाजानं मला उतू येणाऱ्या दूधावर पाणी शिंपडावं लागेल !

बाळूः तू काय झाशीची राणी समजतेस काय स्वतःला ? मला तुझी वीरश्री दाखवू नको.

शकूः ( तटस्थ कोडगेपणाने -- परिणामाची तमा न बाळगता -- ) म्हणजे घटस्फोटाचा विचार फक्त माझ्याच मनात होता असं नाही तर !

बाळूः टेबलावरची फाईल काम न करताच फाईल करायची सवय नाही मला.

शकूः मग ठरवून टाकू आजच काय ते. मलाही कंटाळा आला आता नुसतं भिकार सावकार खेळायचा.

बाळूः नुसतं पीठ मळत बसण्यापेक्षा आत्ताच्या आत्ता जज्जसाहेबांकडे जाऊ -- आहे तयारी ?

शकूः मी तुलासुध्दा भीत नाही, एखाद्या उंदराची भीती घालू नकोस.

बाळूः रोज शंभर उंदीर खाणारा साप आहे तो. आलेल्या माणसाला पूर्ण न्याय दिल्याशिवाय सोडत नाही तो.

शकूः तुझ्या अनुभवातून शिकण्यासारखं काही नाही. कुणालाच. विशेषतः मला. आणि तुलाही.

बाळूः चल तर मग. आज मी आत्महत्या केल्याशिवाय मी तुला सोडणार नाही.

( जातात. आता जज्ज. जज्जसाहेब उघडे. जबरदस्त मसल्स असलेले. बाळू आणि शकू येतात तेव्हा त्यांचे मसल्सचे अनेक व्यायाम प्रकार चालू असतात. घामाघूम झालेले. काही क्षण ते लक्ष देत नाहीत. त्यांचे व्यायाम प्रकार होईपर्यंत दोघेही मसल्सचे प्रकार बघत तटस्थ उभे. )

बाळूः जज्जसाहेब !

जज्जः ( नुसतं करडेपणाने -- ) हं !

बाळूः तसं म्हटलं तर आमचा प्रेमविवाह होता पण आता ही म्हणतेय की गाडी कधीच लेट येणं शक्य नाही.

( यावर जज्जसाहेब जरा हालचाल करून स्नायूंची एक जबरदस्त पोझ घेतात.)

शकूः म्हणजे माझंच पटलंय त्यांना -- बघ, तो स्नायू कसा गरगरीत दिसतोय !

बाळूः ती सूज आहे असं तेच जरा वेळानं दाखवतील तेव्हा तुझे दात घशात जाऊन डोळे पांढरे होतील तुझे.

शकूः जज्जसाहेब, माझं खरं असेल तर तुमच्या दंडांचे स्नायू नऊ इंच वर करा.

( जज्ज पोझ बदलतात.)

बाळूः हे मांड्यांचे स्नायू जग उलथून टाकतील. दंडांचे स्नायू तुझ्या अपेक्षेप्रमाणे प्रगती दाखवू शकलेले नाहीत.

शकूः ( रडू फुटत -- ) असं नका ना करू जज्जसाहेब ! असं नका करू ...

( जज्जसाहेबांची पोझ बदलत नाही.)

बाळूः जज्जसाहेब, ही एक मूर्ख बाई आहे. हिला अजून स्वतःला मुलं किती हेही सांगता येत नाही. याचा सगळा दोष ती पाणी मिसळलेल्या दुधाला द्यायचा प्रयत्न करतीय.( जज्ज पाठमोरे होतात आणि वेगळी पोझ घेतात.)

शकूः ( ऊर बडवत -- ) निकाल द्या जज्साहेब, निकाल द्या.

बाळूः जज्जसाहेब, मला पंडू रोग झालेला नाहीय.

शकूः जज्जसाहेब, माझं ब्लाऊज इस्त्रीचं आहे.

बाळूः जज्जसाहेब, मला टक्कल पडणार नाही.

शकूः जज्जसाहेब, मी नवनाथाची पोथी वाचेन.

बाळूः जज्जसाहेब, माझे विचार प्रश्न सोडवतात.

शकूः जज्जसाहेब, माझ्या कारमध्ये कुत्रं नाही.

बाळूः मी नग्न बायकांची चित्रं पाहतो.

शकूः मी पतिव्रता असल्याचं नीट पाळू शकते.

बाळूः मला खारट अन्न आवडत नाही.

शकूः शेंगदाणे जरा कमी भाजले गेलेत.

बाळूः मला कंटाळा आलेला आहे.

शकूः माझे गाल मुळात चांगले होते.

बाळूः मी फक्त पार्टीत दारू पितो.

शकूः मी मैत्रिणींना घरी येऊ देत नाही.

बाळूः जज्जसाहेब --
शकूः माझी पाळी वेळच्या वेळी होते.
बाळूः जज्जसाहेब --
शकूः मी शनिवारवाड्यावरून भाषण करू शकेन.
बाळूः जज्जसाहेब -- मी -- मी माझ्या घड्याळाला परत किल्ली देऊ शकेन.
शकूः मी गजर करीन.
बाळूः माझे काटे फिरतील.
शकूः मी आकडे होईन.
बाळूः मी थांबणार नाही.
शकूः मी थांबणार नाही.
बाळूः मी थांबणार नाही.
शकूः मी थांबणार नाही.
(... असे चालू असतानाच --)

... पडदा पडत जातो...

**सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता -चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा.
चिंतामणीनगर,
सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११ ००९.

**दूरध्वनी - ४२२ ७८४७.**